# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष- अभिलेख धारिका क्रं. १४२/बाजार समिती/आचार संहिता/७१५१५ /सन२०१८. दिनांक : ७/३/२०१८.

**वाचावे** :-१. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी –विक्री (विकास व नियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (iv) मधील तरतुद.

## -: परिपत्रक :-

**विषय :- राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीसाठी आदर्श आचार संहिता लागु करणे बाबत...**

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी- विक्री (विकास व नियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील बाजार समिती यांच्या सर्व निवडणूकांचे अधिक्षण, संचलन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची आहे. आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (iv) मधील तरतुदीनुसार बाजार समितीच्या निवडणूकांचे पावित्र्य राखणे आणि अशा निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने आदर्श आचार संहिता लागु करणे आवश्यक आहे. आणि,

त्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (iv) अनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण पुढीलप्रमाणे आदर्श आचार संहिता लागु करीत आहे. सदर आचार संहिता अंमलबजावणी करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (कृषि उत्पन्न बाजार समिती) यांना असतील.

१. **अंमलात येण्याचा दिनांक** :- सदर आदर्श आचारसंहिता कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीसाठी तात्काळ प्रभावाने लागु होईल.
२. **आचारसंहिता व्याप्ती** :- निवडणूकीची आचारसंहिता ज्या बाजार समितीची निवडणूक घोषित झाली आहे, अशा बाजार समितीच्या क्षेत्रात (Market Area) तिच्याशी निगडीत बाबींसाठी लागु असेल.
३. **आचारसंहितेचा कालावधी** :- बाजार समितीच्या निवडणूकीची आचार संहिता नामनिर्देशन पत्र सुरू होणेचे तारखेपासून लागू होईल व ती मतमोजणी संपेपर्यंत राहील.
४. **जाहिर प्रचार बंदिचा कालावधी** :- मतदानास सुरूवात होण्यापुर्वी २४ तास अगोदर प्रचार बंद होईल.
५. **आचार संहितेचे पालन** :- बाजार समितीच्या निवडणूकीमध्ये आचासंहितेचे पालन करणे सर्व संबंधीतांना बंधनकारक आहे. आचार संहितेचे पालन याचा अर्थ प्रामुख्याने निवडणूक जाहिर झालेल्या बाजार क्षेत्रातील मतदारांवर प्रभाव पाडणारे निर्णय निवडणूकीच्या तोंडावर विदयमान **संचालक मंडळाने** घेवु नयेत अथवा अशी कोणतीच कृती करु नये असा होतो.

   असे असले तरी, अचार संहितेच्या अंमलबजावणीमुळे बाजार समितीच्या पूर्वीच्याच योजना, उपविधी किंवा इतर नियमात नमुद कामे किंवा दैनंदिन कामकाजात खंड पडू नये अशी अपेक्षा आहे. आचारसंहिता असल्याने संस्थेच्या उद्दिष्टात नमुद कामे व यापूर्वी ज्या कामाबाबत निकष / योजना निश्चित केली आहे, त्याबाबत कार्यवाही करु नये असा आचारसंहितेचा अर्थ होत नाही. जी कामे निवडणुका जाहीर होण्याआधीपासून प्रत्यक्षरित्या सुरु असतील ती तशीच सुरु ठेवता येतील.

संस्थेच्या दैनंदिन कामकाजाव्यतिरिक्त इतर तत्कालिन परिस्थितीत आवश्यक असलेले कामकाज उदा :- अत्यावश्यक निविदा काढणे, जाहिराती देणे आदी बाबींसाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाची परवानगी आवश्यक असेल.

६. **बाजार समितीचे अधिकारी/कर्मचारी :-** ज्या बाजार समितीची निवडणुक घोषित झाली आहे. त्या बाजार समितीचे सेवक आपले दैनंदिन कामकाज सुरु ठेवतील तथापि संस्थेचा कोणताही सेवक, त्या बाजार समितीच्या निवडणुकीत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभाग घेणार नाही. बाजार समितीच्या सेवकाने निवडणुकीमध्ये व प्रचारामध्ये कोणत्याही उमेदवारासाठी अथवा पॅनेलसाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या सहभागी होवू नये.

नामनिर्देशन पत्रे स्विकारण्यास सुरुवात झालेनंतर बाजार समितीचे सर्व सेवक हे निवडणुक निर्णय अधिका-याच्या अधिपत्याखाली येतील. निवडणुकीची घोषणा झालेपासून आचारसंहितेचा कालावधी संपेपर्यंत बाजार समितीचे सर्व सेवक संचालक मंडळास जबाबदार असणार नाहीत. तथापि ते त्यांचेवर सोपविलेली दैनंदिन तसेच पोटनियम अथवा सेवानियमात नमुद कामे करण्याचे चालु ठेवतील.

निवडणुकीची आचारसंहिता लागु झालेनंतर बाजार समितीच्या सेवकांच्या बदल्या करता येणार नाही. तथापि निवडणुक निर्णय अधिकारी निवडणुक कामकाजाच्या सोईसाठी व निवडणुक कालावधीपूरते त्यांना आवश्यक वाटतील तर सर्व अथवा काही सेवकांवर त्यांचे दैनंदिन कामकाजाव्यतिरिक्त इतर कामकाज सोपवु शकतील अथवा एका विभागातुन दुस-या विभागात किंवा एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी निवडणुकीचे कामकाजासाठी त्यांची बदली करु शकतील.

७. **उद्‌घाटन व समारंभ :-** निवडणुका जाहीर झालेनंतर बाजार समितीच्या बाजार क्षेत्रामध्ये बाजार समितीच्या खर्चाने पुर्ण झालेल्या कामांचे उद्‌घाटन समारंभ इत्यादी आयोजित करता येणार नाहीत. तथापी, बाजार समितीच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या किंवा केंद्र शासन अथवा राज्य शासन यांच्या अधिपत्याखालील महामंडळांच्या योजनेतून पुर्ण झालेल्या कामांचा उपयोग सभासदासांठी तात्काळ व्हावा या दृष्टीने समारंभ आयोजित न करता देखील पुर्ण झालेली कामे / योजना सभासदांच्या उपयोगासाठी खुली / सुरु करता येतील.

८. **पदाधिकारी व अधिकारी यांचे दौरे व विश्रामगृहाच्या वापराबाबत :-** बाजार समितीच्या संचालक मंडळाने आचारसंहिता कालावधीत, आचारसंहिता लागु असलेल्या बाजार क्षेत्रात किंवा बाजार क्षेत्राच्या बाहेरही संस्थेच्या खर्चाने दौरे करु नयेत.

संस्थेच्या विश्रामगृहाचा वापर संचालकास, उमेदवारास अथवा इतर कोणासही आचारसंहिता कालावधीत करता येणार नाही.

बाजार समितीची वाहने व कर्मचारी वर्ग यांचा निवडणुकीच्या कामकाजासाठी विद्यमान पदाधिकारी / संचालकांनी कोणत्याही परिस्थीतीत वापर करु नये.

आचारसंहितेच्या कालावधीत राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाचे अधिकारी / कर्मचारी यांना निवडणुकीच्या कामासाठी व निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या पूर्व परवानगीने बाजार समितीचे अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूक कामकाजासाठी बाजार समितीच्या विश्रामगृहाचा व वाहनाचा वापर करता येईल.

९. **वाहनांच्या वापराबाबत :-** बाजार समितीच्या निवडणुकीच्या कालावधीत बाजार समितीची सर्व वाहने निवडणुक निर्णय अधिका-याच्या अधिपत्याखाली राहतील व निवडणुक निर्णय अधिकारी अथवा निवडणुकीशी संबंधीत कर्मचारी बाजार समितीच्या वाहनांचा वापर निवडणुकीच्या कामकाजासाठी व संस्थेच्या दैनंदिन कामकाजासाठी करु शकतील. कोणत्याही परिस्थितीत निवडणुकीच्या काळात प्रचार मोहिम, निवडणुक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधीत प्रचार करण्यासाठी बाजार समितीच्या वाहनांचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे.

१०. **शस्त्रास्त्र बंदी :-** निवडणुका जाहीर झाल्यापासून निवडणुकीशी संबंधीत व्यक्तीस शस्त्रास्त्रे बाळगता येणार नाहीत. ही बंदी निवडणुक प्रक्रीया पुर्ण होई पर्यंत अंमलात राहील.

११. **ध्वजारोहण व शासकीय सण :-** आचारसंहितेच्या कालावधीत प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन अथवा स्वातंत्र्य दिन असे दिवस आल्यास बाजार समितीच्या पदाधिका-यांनी प्रजासत्ताक दिनी अथवा स्वातंत्र्य दिनी ध्वजारोहण करण्यास हरकत नाही. तथापि, अशा कार्यक्रमांच्या नेहमीच्या स्थळांमध्ये बदल करण्यात येवू नये. तसेच या समारंभात करावयाची भाषणे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांचा तसेच देशाचा गौरव यापुरतीच मर्यादित ठेवण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत या समारभांत निवडणुक प्रचाराविषयी भाषणे करता येणार नाहीत. या सूचना महाराष्ट्र दिन, सदभावना दिन, मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अशा दिवसांसाठीही लागु राहतील.

१२. **इलेक्ट्रॉनिक मिडीयाव्दारे प्रचार करणेबाबत :-** इलेक्ट्रॉनिक मिडीयाव्दारे कोणतेही साहित्य प्रसारित करण्यापूर्वी या संदर्भात संबंधीत निवडणुक निर्णय अधिका-याकडुन सदर साहित्य तपासून प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मिडीयाव्दारे देखील प्रचारावर बंदी राहील.

१३. **निवडणुक प्रचारासंदर्भात उमेदवाराने भित्तीपत्रके, पोस्टर्स, बॅनर्स लावण्याबाबत :-** याबाबत सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, १९८४ व तसेच खाजगी वा सरकारी मालमत्ता विद्रुपन कायदा, १९९६ खाली असलेल्या तरतुदी लागू राहतील.

१४. **आचारसंहितेच्या कालावधीमध्ये नेमणुका / भरती करण्याच्यादृष्टीने जाहिराती देणे, मुलाखती घेणे व प्रत्यक्ष नियुक्त्या करणेबाबत :-** आचारसंहितेच्या कालावधीमध्ये संबंधीत बाजार समितीच्या सेवेत भरती करण्याच्यादृष्टीने जाहिराती देणे, मुलाखती घेणे इ.करण्यात येऊ नये. आचारसंहिता लागु होण्यापूर्वीच लेखी वेळोवेळी पत्रे पाठविले असल्यास लेखी परिक्षा घेण्यास हरकत नाही. तथापी, त्याचा निकाल जाहीर करता येणार नाही. तसेच मुलाखती व प्रत्यक्ष नेमणुका याबाबतची कार्यवाही आचारसंहिता कालावधीत करता येणार नाही.

१५. **बाजार समितीच्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठका व संचालक मंडळाच्या बैठका :-** बाजार समितीच्या अधिमंडळाचे वार्षिक तसेच संचालक मंडळ व विविध समित्यांच्या (विषय समित्या इ.) बैठका ज्या कायद्यानुसार घेणे बंधनकारक आहे, त्या घेता येतील. परंतु त्यात नेमणुका, अनुदान, एखादी विशेष योजना जारी करुन त्या अंतर्गत कर्ज अथवा आर्थिक सहाय्य प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरुपात मतदारांना मंजूर किंवा अदा करण्यात येऊ नये. तव्दतच धोरणात्मक निर्णय घेण्यात येवू नयेत. तसेच मतदारांवर कोणत्याही प्रकारे प्रभाव पडेल असे कोणतेही निर्णय घेता येणार नाहीत.

उपरोक्त आदर्श आचार संहितेची अंमलबजाणी करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स) हे त्यांच्यास्तरावर आचार संहिता नियंत्रण कक्षाची स्थापना करतील. संबंधीत कक्षाकडे आचार संहितेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबंधीत कक्षाने चौकशी अंती फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशानुसार.**

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति,**

१. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
३. उप/सह निबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)
५. संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी.